स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.मानव्य विज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

“आदिवासी समाजातील नेतृत्व मा.श्री अशोक रामजी उईके: एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक

सतीश शेषराव चांदेकर

एम.ए.बि.एड. बि.जे. सेट

मु.पो. वाई(बा.), ता.माहूर, जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. खान आय.जी.

एम.ए.एम फील.पीएच.डी. सेट

(राज्यशास्त्र विभागप्रमुख)

श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर, ता.माहूर, जि.नांदेड.

शैक्षणिक वर्ष

“आदिवासी समाजातील नेतृत्व मा.श्री अशोक रामजी उईके: एक चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना (Introduction)

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव हा तालुका आदिवासी बहुल म्हणून ओळखला जातो. यात अनेक लहान लहान खेडे, वस्ती, पाडा, बेडा, पोड, गुडे, यांनी व्यापलेला आहे. या तालुक्यात निसर्गरम्य वनराईने नटलेला जंगलव्याप्त भाग मोठ्या प्रमाणात असून येथील ८५ % जनतेच प्रमुख व्यवसाय हा शेती हाच आहे.

राळेगाव विधानसभा मतदारसंघात ३ तालुक्याचा समावेश होतो. यात प्रामुख्याने राळेगाव, बाभूळगाव, आणि कळंब हे आहेत. राळेगाव विधानसभा मतदारसंघ हा आदिवासीकरीता राखीव मतदारसंघ आहे. सुरुवातीला हा ,मतदारसंघ येळाबारा मतदारसंघ म्हणून ओळखला जात असे. परंतु इसवीसन १९९६७ पासून येळाबारा मतदारसंघ ऐवजी हा मतदारसंघ राळेगाव मतदारसंघ म्हणून ओळखला जाऊ लागला.

स्व. रामजी तुकाराम उईके व स्व.जनाबाई रामजी उईके हे यवतमाळ जिल्ह्यातील रहिवाशी होते. दि. ०१ जानेवारी १९६४ रोजी त्यांनी मा. आ.अशोक रामजी उईके यांना जन्मास घातले. अशोकराव उईके यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंप्री येथे व माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी आदर्श हायस्कूल घोन्सा येथे झाले. पुढील शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण वर्धा जिल्ह्यात झाले. त्यांनी अमरावती विद्यापीठातून एमएस्सी व पीएचडी ही पदवी प्राप्त केली. त्याच बरोबर ते इसवीसन १९९१ मध्ये वयाच्या २७ व्या वर्षी मोर्शी जि. अमरावती येथे पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून रुजू झाले. अध्यापन करीत असतांनाच इसवीसन २००२ मध्येच पिएचडीची पदवी प्राप्त केली. पुढे इसवीसन २००८ मध्ये शिवाजी शिक्षण संस्था व्दारा आर.आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय येथे प्राचार्य पदी निवड झाली.

अशोक रामजी उईके यांचा विवाह यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील यनक या गावात दिना सरके यांच्याशी झाला. त्यांना कु.प्रियदर्शनी उईके, व कु.तेजस्विनी उईके अशा दोन मुली आहेत.

श्री.मा.अशोक उईके यांनी आपल्या राजकीय कार्याची सुरुवात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून केली. त्यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून भारतीय जनता पक्षाने इसवीसन २०१४ साली भारतीय जनता पक्षाने राळेगाव विधानसभा

मतदारसंघाची पक्षातर्फे उमेदवारी दिली. या निवडणुकीत उईके यांनी प्रचंड मतांनी विजय मिळवून विधानसभेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. या मतदारसंघाची भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळख होती. परंतु मा. श्री अशोक उईके यांनी आपल्या नेतृत्वगुणामुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे उमेदवार वसंतराव पुरके या दिग्गज नेत्याचा पराभव केल्यामुळे त्यांची आदिवासी विकास मंत्री पदावर वर्णी लागली. तसेच आपल्या विकासकामाच्या जोरावर इसविसन २०१९ मध्ये दुसऱ्यांदा विजय मिळवून त्यांनी राळेगाव विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले.

तसेच त्यांनी राजकीय व सामाजिक कार्याबरोबरच विद्यार्थी विद्यार्थिनीना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बिरसा मुंडा आदिवासी शिक्षण संस्था बुलढाणा व्दारा संचलित या शिक्षण संस्थेची स्थापना करून शैक्षणिक कार्याची सुरुवात केली हा दृष्टीकोण डोळ्यासमोर ठेऊन मी आदिवासी समाजातील नेतृत्व मा. अशोक रामजी उईके : एक चिकित्सक अभ्यास हा विषय निवडला आहे. म्हणून मा. श्री. अशोक रामजी उईके यांचा परिपूर्ण राजकीय, सामाजिक, आणि राजकीय नेतृत्वगुणाचा अभ्यास करणे माझ्या मते महत्वाचे ठरते. म्हणून मी हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

- **संशोधनाचे महत्व (Important acne of Research subject)**

  नेतृत्व हा लोकशाही शासन व्यवस्थेत महत्वपूर्ण घटक मानला जातो, राजकीय सहभागातील प्रक्रिया घडते आणि त्यामुळे नेतृत्व हे लोकशाहीला अधिक प्रबळ बनवते. इसविसन २०१४ पासून मा. श्री अशोक उईके यांच्या विधानसभा मतदारसंघातील नेतृत्वाला सुरुवात झाली आणि त्यांचे कार्य आणि विचार पुढील नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वाला मार्गदर्शक ठरावे म्हणून मी मा. श्री अशोक उईके यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

  मा. श्री अशोक रामजी उईके यांचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्य बघता ते राळेगाव मतदारसंघाचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जातात. म्हणून त्यांच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा पगडा समाजात खोलवर बिंबवला गेला. तसेच त्यांनी आदिवासी समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी कोणते प्रयत्न केले ? राळेगाव मतदार संघात विकासात्मक कामे केली का? आदिवासी विकास मंत्री म्हणून त्यांनी कोणत्या योजना राबविल्या? त्यांचे नेतृत्व कसे व कोणत्या परिस्थितीतून विकसित होत गेले? या सारख्या कारणांचा शोध

घेण्यासाठी आदिवासी नेतृत्व म्हणून मा. श्री अशोक रामजी उईके यांच्या नेतृत्वावर संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय अभ्यासासाठी निवडण्याचे ठरविले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे : (Research objective)

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्यापनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. मा.श्री. अशोक रामजी उईके यांची कौटुंबिक पार्श्वभूमी अभ्यास करणे.
२. मा.श्री. अशोक रामजी उईके यांच्या राजकीय कामगिरीचे मुल्यांकन करणे.
३. मा. श्री अशोक रामजी उईके यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
४. मा.श्री. अशोक रामजी उईके यांचे विधानसभा या सभागृहातील कामकाजाचा अभ्यास करणे.
५. मा.श्री. अशोक रामजी उईके आदिवासी विकास मंत्री या दृष्टीने कारकीर्द अभ्यासणे.
६. मा.श्री. अशोक रामजी उईके यांचा विकास कार्याविषयी दृष्टीकोण जाणून घेणे.

संशोधनाची ग्रहीतके : (Research Hypothesis)

प्रस्तुत संशोधन विषया संबंधी संशोधकाने पूर्व अनुमानाच्या आधारावरती काही ग्रहीतके निश्चित केलेली आहेत. ती खालील प्रमाणे आहेत.

१. शिक्षण व ज्ञान असलेल्या व्यक्तीचे नेतृत्व अनुयायी मान्य करतात.
२. मा.श्री. अशोक रामजी उईके यांच्या नेतृत्व विकासात त्यांचे व्यक्तीगत गुण कारणीभूत आहेत.
३. राजकीय पक्षामुळे मा.श्री. अशोक रामजी उईके यांचे राजकीय नेतृत्व विकासात हातभार लागला.
४. नेतृत्व हे व्यक्तिगत व परिस्थितीजन्य या दोन्ही कारणामुळे उदयास येते.

संशोधन समस्या : (Research problem)

मा.श्री अशोक रामजी उईके सामान्य आदिवासी कुटुंबातील व्यक्तीला राज्य पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली तसेच त्यांनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य हे अभ्यासासाठी आकर्षणाचा विषय ठरला.

१. मा.श्री अशोक रामजी उईके यांच्या राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीत राजकीय वारसा होता का ?
२. राळेगाव विधानसभा मतदारसंघात आदिवासी मतदार बहुसंख्य आहेत का ?
३. मा. श्री अशोक रामजी उईके यांचे विधानसभेतील नेतृत्व पुढे येण्यास आर्थिक, सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे का ?
४. राळेगाव विधानसभा मतदारसंघ आदिवासी साठी राखीव असल्यामुळे त्यांना विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी मिळाली का ?
५. या दृष्टीकोणातून आदिवासी समाजातील मा. श्री अशोक रामजी उईके यांचे राजकीय नेतृत्व हा विषय संशोधनाचा भाग ठरत असल्यामुळे प्रस्तुत विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

अभ्यास क्षेत्र : (Area of Study)

प्रस्तुत संशोधनासाठी आदिवासी समाजातील नेतृत्व मा.श्री.अशोक रामजी उईके यांचा राजकीय नेतृत्वाचा एक चिकित्सक अभ्यास या संशोधन समस्येच्या अनुशंगाने अभ्यास करतांना राळेगाव विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पद्धती : (Research Methodology)

संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्र पद्धतीने असल्यामुळे संशोधनात प्राथमिक व दुय्यम माध्यमाचा वापर संशोधन प्रबंधाला दिशा प्राप्त करून देण्यासाठी करण्यात आला. यात ग्रंथालयातील संदर्भ साहित्य पुस्तके, अभ्यास पद्धती, मुलाखत, विधानसभेतील दस्तऐवज, प्रश्नावली, शासकीय प्रकाशने, संदर्भ ग्रंथ, वाढदिवसानिमित्य गौरव अंक, विशेषांक, मासिके, विविध वर्तमानपत्रातून प्रकाशित झालेल्या विकासात्मक बातम्या,

प्रकरणाची रूपरेषा : (Chapter planning)

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी, पैलू लक्षात घेता अभ्यासाकरिता विषयाची मांडणी सात प्रकरणात केलेली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या,संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची ग्रहीतके, संशोधन पद्धती, अध्ययन क्षेत्र व संशोधन आराखडा इत्यादी घटकाची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : मा. श्री अशोक रामजी उईके यांची कौटुंबिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात मा. श्री अशोक रामजी उईके यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे अध्ययन करण्यात येईल यात जन्म व बालपण, प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण, वैवाहिक जीवन आणि व्यक्तिमत्वावरील प्रभाव इत्यादी

प्रकरण तिसरे : आदिवासी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी ही संकल्पना, आदिवासी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आदिवासी समाजातील जाती, उपजाती, त्यांच्या आर्थिक, सांस्कृतिक धार्मिक बाबी, वैशिष्ट्ये तसेच आदिवासी समाजात होत असलेल्या सुधारणा इत्यादी घटकाची चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण चवथे : नेतृत्वाची संकल्पना

प्रस्तुत प्रकरणात नेतृत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करण्यात येईल. नेतृत्वाचा अर्थ व व्याख्या, नेतृत्वाचे प्रकार, नेतृत्वाचे घटक, नेतृत्वाची जडणघडण, नेतृत्वातील गुण आणि दोष इत्यादी.

प्रकरण पाचवे : मा.श्री. अशोक रामजी उईके यांच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण.

प्रस्तुत प्रक्ररणात मा. श्री अशोक रामजी उईके यांच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीमध्ये कारणीभूत ठरलेल्या विविध पैलूवर प्रकाश टाकला जाणार आहे. यामध्ये त्यांच्या आजपर्यंतच्या जीवनप्रवासात झालेल्या थोरा मोठ्यांच्या भेटी गाठी व त्यांच्याकडून त्यांना मिळालेले मार्गदर्शन व त्यांनी अभ्यासलेली विविध महापुरुषांच्या जीवन चरित्राचे त्यांनी केलेले अध्ययन व त्याचा त्यांच्या जीवनावर पडलेला प्रभाव आदि बाबी.

प्रकरण सहावे : मा.श्री. अशोक रामजी उईके यांची राजकीय कार्ये.

प्रस्तुत प्रकरणात इसवीसन २०१४ पासून अद्याप पर्यत राळेगाव विधानसभा मतदार संघातील केलेल्या नेतृत्वाचा विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये अभ्यास विषयामधून निष्पन्न झालेले निष्कर्ष, ग्रहीत कृत्यांची पडताळणी आणि त्यावर आधारित महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भग्रंथ सूची

१. खेकाळे ना.र, राजकीय नेतृत्व, मंगेश प्रकाशन नागपूर

२. गव्हाणे अजय, संसदीय लोकशाहीची आयुधे, क्रिएटिव्ह पब्लिकेशन नांदेड

३. भांडारकर पु. ल, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर.

४. तुमराम विनायक, आदिवासींच्या सशक्तीकरणाची आधारतत्त्वे, नागपूर.

५. आगलावे प्रदीप, आदिवासी समाजातील समाजशास्त्रे,श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

६. गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टीटेनल पुणे

७. महाराष्ट्र विधान मंडळ, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा प्रधान सचिव, विकास पाटील

८. स्वामी एन.के. भारतमे संसदीय व्यवस्था, अविष्कार पब्लीशेअर्स नागपूर.

९. Srivastav L.N. Asimble of Local Self Government In India Ashish Publishing New Delhi 1993

संशोधक **मार्गदर्शक**

सतीश शेषराव चांदेकर